3/3/86

**३ मार्च १९८६ चलो नाशिक रोड !**

*महाराष्ट्र राज्य शेजमजूर परिषदेच्या वतीने -*

# नाशिकच्या महसूल आयुक्तांच्या कार्यालयावर, अहमदनगर नाशिक धुळे व जळगांव जिल्ह्यांतील शेतमजूर - रोजगार हमी कामगारांचे

# बेमुदत धरणे

*सोमवार दि. ३ मार्च १९८६ रोजी सकाळी ११ वा. पासून सुरू होणार.*

**प्रत्येक गांवातून २ ते ५ प्रतिनिधी तयारीनिशी पाठवा.**

रोजगार हमी कामगार बंधू भगिनिंनो!

१९७२-७३ च्या महा दुष्काळाचे काळात महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त शेतमजूर व गरीब शेतकरी यांनी केलेल्या उग्र चळवळीमुळे व १६ मे १९७३ रोजी महाराष्ट्रातील १५ लाख दुष्काळी कामगारांचे संपामुळे रोजगार हमीचा कायदा झाला. १९४८ साली झालेल्या कायद्याखाली शेतमजूरांसाठी किमान वेतन दर ठरविण्यात आले.

रोजगार हमी कायद्यातील व नियमातील तरतुदीनुसार रोजगाराची गरज असणाऱ्याने नमुना क्र. ४ मध्ये अर्ज केल्यानंतर त्याची पोहच देऊन १५ दिवसांत तहसिलदाराने गांवाजवळ काम उपलब्ध करुन दिले पाहीजे. तसे काम नसल्यास पंचायत समिती हद्दीत काम द्यावे, तसे काम नसल्यास जिल्ह्यांत इतरत्र काम उपलब्ध करुन द्यावे, व काम न दिल्यास बेकाम भत्ता द्यावा अशी कायद्यात तरतुद आहे.

मात्र रोजगाराची मागणी करणारे नमुना ४ मधील अर्जाचे नमुने शासनाने उपलब्ध केले नाहीत. अ'नगर जि. शेतमजूर युनियनने दाखल केलेल्या याचिकेच्या निर्णयात शासनाने फॉर्मस उपलब्ध करुन द्यावेत असा मा. उच्च न्यायालयाला आदेश द्यावा लागला. निरनिराळ्या जिल्ह्यातील युनियन्सनी हजारो फॉर्म्स छापून घेऊन हे काम चालविले आहे.

मात्र अलीकडे व्यापक चळवळ असलेल्या कोपरगांव, श्रीरामपूर व राहुरी या तालुक्यात युनियनच्या वतीने छापलेले फॉर्म भरुन दिले तर तलाठी ते स्विकारुन पोहच देत नाहीत. तहसिलदाराकडे गांव समित्या अथवा युनियनच्या वतीने सादर केलेले अर्ज स्विकारले जात नाहीत नाशिक, धुळे, जळगांव, औरंगाबाद इ. जिल्ह्यांतही असाच अनुभव येत आहे.

## – गांव समित्यांची चळवळ –

नगर जिल्ह्यांतील श्रीरामपूर, कोपरगांव भागात रोजगार हमी कायद्याची सक्त अंमलबजावणी करुन घेण्याच्या सातत्यपूर्ण चळवळीचे परिणामी गांवोगांवी शेतमजूर व गरिब शेतकरी स्थिरपणावर संघटीत झाले. त्यांच्या गांवसमित्या संघटीत होऊ लागल्या. नियमितपणे रोजगार मिळणें, योग्य व वेळेवर वेतन, भ्रष्टाचाराचा बंदोबस्त, गांवातील स्वस्त धान्याच्या दुकानात चांगले धान्य, साखर व इतर वस्तु उपलब्ध करणे, धन दांडग्यांच्या दादागिरीला व दडपशाहीला विरोध अशा उपक्रमात या गांवसमित्यांनी पुढाकार घेऊन हालचाली सुरु झाल्या त्यामुळे अधिकारी व गांवोगांवातील प्रतिष्ठित सधन शेतकरी व त्यांचे प्रभावाखाली असलेले विविध राजकीय पक्ष यांना गांवोगांवी वर्ग पायावर संघटीत होऊ लागलेल्या गांव समिती यांची चळवळ काट्यासारखी रुतू लागली दुष्काळाचे पार्श्व भुमिवर मध्यम शेतकरी थरातील मजुरांची संख्या वाढत आहे. ते ही या चळवळीत भागिदारी करु लागले यामुळें अधिकारी आणि सधन शेतकरी थरातले नेतृत्व यांचा विरोध वाढू लागला

## रिट अर्जामुळे सरकारचे डोके उठले.

अ'नगर जिल्हा शेतमजूर युनियनने मुंबई उच्च न्यायालयांत दाखल केलेल्या रिटपिटीशन क्र. ४५५४ मध्ये मा. न्यायालयाने रो. ह. कायद्याखाली दुष्काळी टापूसाठी शेतमजूरांसाठी ठरविलेल्या ४ थ्या परिमंडळ (झोन) साठी ठरविलेले किमान वेतन दर देण्याची तरतुद रदबदल ठरविली व त्या त्या परिमंडळातील कि. वे. दर द्यावेत असा निर्णय दिला. त्यामुळे बारमाही बागायती टापूत १०, रुपये हंगामी टापूत ८ रुपये बिगर दुष्काळी जिरायत भागात ७ रुपये अशा प्रकारे वेतनवाढ देण्यासाठी

शासनाच्या रो. हृ. कामाचे दरात वाढ करावी लागली, त्यामुळे सरकारचे डोके उठले. तसेच रो. हृ. कायद्याखाली १ रु ऐवजी २ रु बेरोजगार भत्ता देण्याचा उच्च न्यायालयाने निर्णय दिला व कायदा झाल्यापासून राज्यात शासनाला प्रथमच श्रीरामपूर तालुक्यातील मालुंजे येथील रो. हृ. कामगारांना भरपाई द्यावी लागली.

## – सरकारी व्यवहाराचा एक नमुना –

सातत्य पूर्ण चळवळीच्या भागातील नमुन्यादाखल खालील अनुभव उद्बोधक आहे.

कोपरगांव तालुक्यातील नमुना नं. ४ मधील हिंगणी धारणगांव मायगांव देवी व कारवाडी येथील ४४६ अर्ज तक्रारी, तहसिलदार यांनी घेण्याचे नाकारले असल्याने जिल्हाधिकाऱ्यांकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठविले परंतु त्यांनी ते युनियनला परत पाठविले व नोंदणी अधिकाऱ्यांकडे देण्याचे कळविले. या नंतर दि. १३ जानेवारी १९८६ रोजी २००० मजूरांनी कोपरगांवला मोर्चा नेला तरी तहसिलदारांनी ते घेतले नाहीत, काम दिले नाही म्हणून २६ जानेवारीला मजुरांनी झेंडावदनाच्या कार्यक्रमात भाग घेऊन निदर्शने केले सदर प्रसंगी **आ. रोहमारे, आ. वहाडणे** हजर होते.

दिनांक २७ जानेवारी रोजी १६ गावचे मजूर रेल्वेने जिल्हाधिकाऱ्याकडे मोर्चाने गेले तेव्हा दोन दिवसात काम देतो असे आश्वासन दिले. परन्तु मजूरांनी १५० किलोमीटर अंतरावरील कुकडी डावा कालवा कि. मी. क्रमांक १११ ते ११४ येथे कामावर जावे असा लेखी आदेश तहसीलदारांनी मजूरावर बजावला,

श्रीरामपूर तालुक्यांतील मजूरांनी दिनांक १७।१।१९८६ रोजी नमुना ४ मध्ये केलेल्या अर्जाला लेखी उत्तर म्हणून श्रीरामपूरच्या तहसीलदारांनी टाकळीभानच्या मजूरांना ११० कि. मी. वरील कुकडी डावा कालवा उपविभाग पिंपळगांव पिसा, बेलवंडी नं, १९ या ठिकाणी कामावर जाण्याचा आदेश दिला.

## १५० कि. मी. कुकडी वरच्या कालव्यावर काम उपलब्ध नाही.

दिनांक ५।२।८६ रोजी कार्यकर्ते व मजूर प्रतिनिधींनी जाऊन कुकडी डावा कालवा कि, मी. १११ ते ११४ अशी समक्ष पहाणी केली. ती कामे कंत्राटदारामार्फत चालु होती, पूर्वी काही कंत्राटदार कामे टाकुन पळून गेले होते. तेथे मुख्यत: पुलाची बांधकामे चालू आहे म्हणून कोपरगांव, श्रीरामपूर तालुक्यांतील मजुरांना तेथे काम नाही, हे स्पष्ट झाले, जिल्हाधिकाऱ्यांना हे कळविले होते, परन्तु अद्याप काम दिले नाही किंवा बेकाम भत्ता दिला नाही,

सध्या नेहमीच्या दुष्काळी टापूत बिकट परिस्थिती आहे, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न युध्दपातळीवर सोडविण्याच्या घोषणा गेली ३ वर्ष मुख्यमंत्री करीत आहेत, तरीही पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कधी नव्हता एवढा तीव्र बनलेला आहे,

१९७३-७४ च्या दुष्काळात ५० लाखावर ग्रामिण श्रमिक कामावर होते, किमान १५ लाखांना हंगाम चांगला असला तरी रोज रोजगाराची गरज असते, असे निष्पन्न झालेले आहे, परन्तु सध्या ६ ते ७ लाख गरजुंना रोजगार पुरविला जात आहे, मागणी असतां ही कामे शक्यतो काढायची नाहीत, काढली तर अल्पमुदतींत बंद करायची पगार ३–४ आठवडे अडवून ठेवायचे पगार कमी पाडायचे लांब अंतरावर काम द्यायचे, अलीकडे तर रोजगार हमी योजनेखालील कालवे व चाऱ्यांची तसेच कुशल कामे बंद करण्याचे आदेश काढण्यांत आले आहे, धरणांची कामे या पूर्वीच बंद करुन खात्यावरील कामगारावर नोकर कपात लादली जात आहे,

धान्य कुपने दिली तर धान्याची व्यवस्था करायची नाही, गरजुंना काम शक्यतो द्यायचे नाही, म्हणजे अन्नापासुन आणि पाण्यावाचून ही जनतेला उपाशी ठेवण्याचा महाराष्ट्र सरकारचा अनुभव येत आहे,

दुष्काळाचे निर्मूलन करणे शक्य आहे, हे शास्त्रीय दृष्ट्या सर्वच मान्य करतात, त्यासाठी पावसाचा प्रत्येक थेंब आडविणे व जमिनीत मुरविणे आवश्यक आहे, त्यासाठी छोट्यामोठ्या सर्व धरण योजना पुऱ्या करणे कंटूर व नाला बंडींग, पाझर तलाव, नद्या व ओढ्यांचा काठ पायऱ्यापायऱ्याने बांधून काढणे, जमीन तयार करणे, डोंगर उतारावर मोठे आडवे चर खोदणे व झाडो लावणे नद्या व नाल्यांत भूमिगत पाझर तलाव बांधण्याची कामे पुरी करणे, त्यासाठी प्रत्येक धरण प्रकल्प ग्रस्तांचे लाभ क्षेत्रातुन जमिन व निधी संपादन करून विकसनशिल पुर्नवसन केले व पाटपाण्याच्या वाटपाची सध्याची पध्दत बदलून माणसांच्या संख्येप्रमाणे रेशनींग केले, तर दुष्काळ हटेलच, तसेच महाराष्ट्राच्या विकासाचा मार्ग मोकळा होईल

परन्तु सधन शेतकऱ्यांच्या प्रभुत्वाखालील महाराष्ट्र सरकार संकुचित वर्ग हिताचा विचार करुन हे कारण अमलांत आणत नाहीत, म्हणून दुष्काळा मध्ये वर्षानुवर्षे मराठी जनतेला हालअपेष्टा भोगाव्या लागत आहेत,

सामान्य कष्टकरी जनता सतत वाढणारी महागाई, बेकारी, दारिद्रय, भ्रष्टाचार, अन्याय अत्याचाराने गांजलेली आहे. पंतप्रधान राजीव गांधींच्या सरकारने स्वस्त धान्य दुकानातील गहु, तांदुळ, ज्वारी साखर यांचे भाव वाढविणे, पेट्रोलजन्य वस्तूंच्या किंमतवाढीमुळे रॉकेल, गॅसची किंमत वाढलीच पण वहातुक खर्च वाढल्याने निमित्ताने सर्वच बाजूंची वाढ झाली आहे. परंतु

शेतमजुरांच्या व रो. ह यो च्या कामाच्या दरात दरवाढ मान्य करत नाही. पंतप्रधानाच्या झटपट आधुनिकीकरणाच्या धोरणाच्या नांवाखाली संगणक यंत्रे, अत्याधुनिक यंत्रतंत्राची आयात यामुळे बेकारीत भर पडत आहे. गरीबी कमी होण्याऐवजी वाढत आहे. देशातील बडे भांडवलदार, व्यापारी, सधन शेतकरी, बडे व्यावसायिक व नवे उद्योजक यांची बरकत होत असुन त्यांची संपत्ती वाढत आहे

तेंव्हा रोजगार हमी कायद्यातील तरतुदीची संपुर्ण अंमलबजावणी व त्यात सुधारणा करण्याचा आपला लढा हा दुष्काळ निमूंलनाचा व महाराष्ट्राच्या विकासाचा लढा आहे. गांवोगांव आपल्या व शेतमजूर - गरीब शेतकऱ्यांच्या स्वतंत्र संघटना उभारुन गांवकमेट्या स्थापन करुन तो लढवावा लागणार आहे.

या लढ्याचे क्रमांत दुष्काळाचे निर्मुलन पाट पाण्याचे फेरवाटप झाले पाहीजे. खाजगी शेतीवरिल शेतमजुरांना संघटीत होण्यास कि वे ची अमलबजावणी करुन घेण्यास चालना मिळेल. आदिवासी व दलीतांच्या बड्यांनी लुबाडलेल्या हस्तांतरित जमिनी परत मिळणे, कसवणुकीस आणलेल्या सरकारी जमिनी कायम हक्काने मिळणे व धरण प्रकल्पग्रस्तांचे विकसनशील पुनर्वसन करुन घेणें. दलीत, आदिवासी, व स्त्रियांवरिल अत्याचाराचा बंदोबस्त करणे या आपल्या वर्ग प्रश्नांच्या सोडवणुकीस मदत होणार आहे त्यासाठी शक्ती उभी रहाणार आहे.

रोजगार हमी कायद्यातील तरतुदींच्या सध्या चाललेल्या पायमल्ली चे धोरण बदलण्यासाठी व निर्माण केलेले आडथळे काढण्यासाठी नाशिक महसूल विभागातील अहमदनगर, नाशिक, जळगांव व धुळे जिल्हयांतील संघटीत गांवातून प्रत्येकी २ ते ५ प्रतिनीधी **सोमवार दि. ३ मार्च १९८६ पासून नाशिक रोड येथील महसूल आयुक्तांचे कार्यालयापुढे निर्णय लागे पर्यंत धरणे धरुन बसणार आहेत. चार दिवसात निर्णय न लागल्यास पाचव्या दिवशी गावो गावी रस्ता रोको आंदोलन छेडले जाईल. अशी तयारी करावी महाराष्ट्रातील इतर भागात पाठिंबा दर्शक सभा, मोर्चे धरणे असे कार्यक्रम अयोजित करावेत कार्यक्रमात मोठ्या प्रमाणात भागिदारी करावी अशी विनंती आहे.**

महाराष्ट्र राज्य शेतमजूर परिषदेच्या वतीने खालील मागण्यासाठी **६ एप्रिल रोजी संगमनेर येथे** राज्य परिषद, होणार असून राज्यव्यापी लढा उभारण्याचा लढ्याचा कार्यक्रम ठरणार आहे, आपल्या धरणे **कार्यक्रमात** या मागण्याचा आग्रह आपणास धरवयाचा आहे.

## —: मागण्या :—

१) प्रत्येक गरजूस गांवापासून ५ कि. मी. च्या आत काम मिळाले पाहिजे, काम न दिल्यास म. भ. सह होणाऱ्या वेतनात ५० टक्के दराने बेकार भत्ता १५ वर्षा वरील युवक—युवतींना रो. ह. यो काम मिळाले पाहिजे.

२) रो. ह. कामातून निर्माण होणारी संपत्ती व जिंदगी यामध्ये रो. ह. कामगारांना वाटा मिळाला पाहिजे.

३) पिण्याचे पाणी, लहान मुलासाठी कामाचे ठिकाणी व गांवोगांव पाळणा घरे. वेळेत पगार, मापे घेवून चिठ्या देणे व भ्रष्टाचाराचे मजूर समित्या मार्फत बंदोबस्त व लांबचे कामावर वाहन व कॅम्पची व्यवस्था केली पाहिजे.

४) कामाचे ठिकाणी दर मजूरास रोज एक किलो स्वच्छ व सकस धान्य व जिवनावश्यक वस्तू पगाराच्या वेळेस देण्याची व्यवस्था झाली पाहिजे.

५) गाव पातळीवर गांवसमित्या, तालुका व जिल्हा पातळीवर म. रा. शेतमजूर परिषदेच्या संलग्न युनिनयचे व मजूराचे लढाऊ प्रतिनिधी सल्लागार समितीवर व रो.ह. कायद्यातील तरतुदीनुसार परिषद व इतर राज्यव्यापी शेतमजूर व रोह कामगार संघटनेचे प्रतिनिधी घ्यावेत

६) सध्या आस्तित्वात असलेले शेतमजूर किमान वेतन दर ठरल्यापासून महागाईत दुप्पट वाढ झालेली असल्याने सरकारने आदेश काढून शेतमजूर कि. वेतन दरात व रोह कामाचे

दरात दुप्पट वाढ करण्यात यावी, शेतमजूर कि. वे. अतिकुशल, कुशल, निमकुशल, कामाचे दर ठरविणे कि. वे. निर्देशाकांशी जोडण्यात यावेत.

७) मुंबईचे उच्च न्यायालयाच्या निवाड्या नुसार सुधारीत दराची अंबलबजावणी काही टापू वगळता इतरत्र केली गेली नाही २०–९–१९८४ पासून फरकासह सुधारीत दराची अंमल–बजावणी करण्यात यावी.

८) कामासाठी अवश्यक हत्यारे पुरविली जात नाही. ती हत्यारे गाव समितीकडे वाटण्या साठी द्यावी रोह कामावरील भ्रष्टाचाराचा बंदोबस्त करण्यासाठी कामगांराच्या समित्यांना मापे, वेतनपत्रके, हजेरी पत्रके पहावयास मिळाली पाहिजेत.

९) शेतमजूरासाठी कामगारांना लागु असलेल्या सेवाशर्तीची तरतूद करणारा स्वतंत्र कायदा केला पाहिजे

१०) शेतमजूर व रोह कामगारांना पेन्शन व विमा योजना लागू करावी,

११) रोह कायद्याखाली ' ब ' वर्ग नगरपालीकेच्या कक्षेतील गरजुंना कामे पुरविण्यात यावीत,

तेव्हा कामावर व गांवागांवातून वर्गण्या जमा करुन व प्रत्येक गांवातून २ ते ५ प्रतिनिधी धरणे कार्यक्रमासाठी पाठवावेत अशी विनंती आहे,

आपले विश्वासू,

| | | | |
|---|---|---|---|
| भि. र. बावके<br>चिटणीस | सौ. पुष्पलता आरळकर<br>चिटणीस | गणपत लोके<br>उपाध्यक्ष | भास्कर जाधव<br>सरचिणीस |
| बी. डी. पाटील | काशिनाथ आळवणी | पांडूरंग पुंजाराम सोनवणे | |
| गुलाबराव देशमुख | पी. डी. शेवाळे संतोष माळी | सुरेश गवळी | अर्जुन सुर्वे |

महाराष्ट्र राज्य शेतमजूर परिषद

टीप– १) धरणे कार्यक्रमास येणाऱ्या प्रतिनिधींनी बरोबर अंथरूण – पांघरुन, जेवण्यासाठी ताटवाटी, २ किलो तांदुळ पावशेर डाळ आणावी. किमान पाच दिवसाच्या तयारीने यावे.

(सहृ. सेवक, श्रीरामपूर)